**आकाशवाणी पुणे**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक – 10/06/2024** **वार – सोमवार**

---

## पालखीआपलादवाखाना

संत श्री ज्ञानेश्वर माउली आणि संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहोळ्यात सहभागी वारकऱ्यांच्या सोयीसाठी आरोग्य विभाग 258 आपला दवाखान्याची सुविधा उपलब्ध करुन देणार आहे. पालखी मार्गावरील प्रत्येक 5 किलोमीटर अंतरावर हा दवाखाना सुरु असेल. पालखी मार्गावर 32 ठिकाणी अतिदक्षता विभागातील सोयी सुविधा असणाऱ्या 87 खाटा सज्ज असतील. तसंच 707 रुग्णवाहिका 24 तास वारकऱ्यांच्या मदतीसाठी असतील. महिलांसाठी प्राथमिक उपचारांची 4 हजार 500 पाकिटं प्रत्येक दिंडी प्रमुखांकडे सोपवली जाणार आहेत.

दरम्यान पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक पार पडली. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक व्यवस्था करावी, मुक्कामाच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष उभारावा, वारकऱ्यांसाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.

## राष्ट्रवादीकाँग्रेसवर्धापनदिन

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये उभी फूट पडल्यानंतर पक्षाचा 25 वा वर्धापन दिन आज अजित पवार गटातर्फे मुंबईत आणि शरदचंद्र पवार गटातर्फे पुणे आणि अहमदनगरमध्ये साजरा होत आहे. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार दिवंगत  यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांवर आपण काम करत आहोत; जनतेची सेवा आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान जपण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, अशी भावना शरद पवार यांनी पुण्यातील कार्यक्रमात व्यक्त केली. खासदार सुप्रिया सुळे आणि शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्यासह पक्षाचे नेते कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

**मिळकतकर**

मिळकतकराच्या थकबाकीच्या वसूलीसाठी पुणे महापालिकेने 2020-21 आणि 2021-22 या वर्षात अभय योजना आणली होती. या योजनांमुळे महापालिकेचं 275 कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. या योजनेचा ज्या मिळकत धारकांनी फायदा घेतला, त्यातील 98 हजाराहून अधिक लोक पुन्हा थकबाकीदार झाले आहेत. सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी माहिती अधिकाराच्या माध्यमातून ही माहिती उघड केली आहे.

**डेंग्यू**

राज्यात यंदा जानेवारी ते  मे या काळात डेंग्यूचे 1 लाख 27 हजार 140 संशयित रुग्ण आढळले. गेल्या वर्षी याच कालावधीत ही संख्या 81 हजार 731 होती. यंदा निदान झालेल्या डेंग्यू रुग्णांची संख्या 1 हजार 755 आहे. गेल्या वर्षी ही संख्या 1 हजार 237 होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत रुग्णसंख्या यंदा वाढली आहे, अशी माहिती आरोग्य विभागाचे संहसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी दिली.

**दृष्टिदानदिवस**

जागतिक दृष्टिदान दिनानिमित्त नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑफ्थल्मॉलॉजीतर्फे आज पुण्यात नेत्रदानाविषयी जनजागृती करण्यात आली. यावेळी रुग्णांची तपासणी तसंच मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प करण्यात आला. त्याचबरोबर खडकीच्या क्वीन मेरी टेक्निकल इन्स्टिट्यूटमधल्या जवानांसाठी, नेत्रदान-समज आणि गैरसमज; या विषयावर डॉ. मिलिंद भोई यांचं व्याख्यान झालं; या कार्यक्रमात अनेक जवानांनी नेत्रदानाचा संकल्प केला.

**भीमसेनजोशीसंगीतमहोत्सव**

कलाश्री संगीत मंडळ आणि औंध सोशल फाउंडेशनच्यावतीने येत्या 14 ते 16 जून या कालावधीत भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. आयोजकांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. प्रसिद्ध गायक भुवनेश कोमकली, देवकी पंडित, शर्वरी जमेनीस यांच्यासह अनेक नामांकित कलाकार या महोत्सवात आली कला सादर करणार आहेत.

**बालगंधर्वगळती**

पुण्यात गेल्या दोन तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळं बालगंधर्व रंगमंदिर आणि पुणे महामेट्रोच्या काही स्थानकातही गळती झाल्याचं उघड झालं आहे. अवघ्या दोन महिन्यांपूर्वी सुमारे दीड कोटी रुपये खर्च करुन बालगंधर्व रंगमंदिराची संपूर्ण दुरुस्ती करण्यात आली होती. एका नाटकाचा प्रयोग सुरू असताना ही गळती झाल्यानं महापालिकेच्या कामाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झालं. महापालिकेनं मात्र ही गळती किरकोळ स्वरुपाची असल्याचं स्पष्टीकरण दिलं आहे. दुसरीकडे महामेट्रोच्या आनंदनगर आणि सिव्हिल कोर्ट स्थानकातही या पावसामुळं गळती झाली. ही स्थानक उघड्यावर असल्यानं पावसाचं पाणी थेट फलाटावर येत असल्याचं स्पष्टीकरण महामेट्रोनं दिलं आहे.

**टेबलटेनिस**

पुण्यात सुरू असलेल्या जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत महिला गटात नैशा रेवसकर हिने विजेतेपद पटकावत विजेतेपदाचा चौकार नोंदवला. तिने यापूर्वी 15,17 आणि 19 वर्षाखालील गटात अजिंक्यपद मिळवलं होतं. पुरुष गटात संस्कार बसाक याने चमकदार कामगिरी करत विजेतेपद पटकावलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात सध्या मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. उद्याही शहरात हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**